**जनसंपर्क अधिकारी**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट-२९७/२०२२** **दिनांक : ०३/१०/२०२२**

## नवघर व विरार पोलीसांनी गुन्हयातील २४,३१,०५० रुपयांचा जप्त मुद्देमाल पिडीतांना केला परत.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या दुसऱ्या वर्धापन दिनाच्या औचित्यावर पोलीसांचे वतीने विविध उपक्रम राबवून सप्ताह साजरा करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने आज दिनांक ३/१०/२०२२ रोजी विरार पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या विविध ८ गुन्हयातील १४,१९,५००/- रुपयांचा जप्त मुद्देमाल फिर्यादी/पिडीतांना श्री प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ यांचे हस्ते परत करण्यात आला. सदर मुद्देमालामध्ये १४ तोळे सोन्याचे दागिने, ४ मोटारसायकल व इतर वस्तूंचा समावेश होता.




फिर्यादी यांना मुद्देमाल परत करतांना श्री प्रशांत वाघुंडे, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-३, श्री रामचंद्र देशमुश, सहा पोलीस आयुक्त, श्री सुरेश वराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विरार पोलीस ठाणे.

तसेच नवघर पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या विविध १८ गुन्हयातील १०,११,५५०/- रुपयांचा जप्त मुद्देमाल फिर्यादी/पिडीतांना सहा. पोलीस आयुक्त श्री शशीकांत भोसले, नवघर विभाग यांचे हस्ते परत करण्यात आला. सदर मुद्देमालामध्ये १० ऑटोरिक्षा, ४ मोबाईल हॅन्डसेट, सोन्याचे दागिने व इतर वस्तूंचा समावेश होता.




फिर्यादी यांना त्यांचा मुद्देमाल परत देतांना श्री शशीकांत भोसले, सहा. पोलीस आयुक्त, श्री मिलींद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक व इतर अधिकारी

नवघर व विरार पोलीसांचे वतीने एकुण २४,३१,०५०/- रुपयांचा मुद्देमाल फिर्यादी यांना परत देण्यात आला असून आरोपीतांनी लबाडीने चोरुन नेलेल्या किंमती वस्तू पोलीसांचे मार्फतीने कायदेशीर पुर्तता करुन परत मिळाल्याने पिडीतांनी समाधान व्यक्त केले आहे.

----ooo----